मुक्तागिरी

■ सोमवार, दि. २७ डिसेंबर २०२१
www.emuktagiri.in

संमिश्र

# सामाजिक जाणीवांचे प्रेरणा भवन : लोकनेते रामशेठ ठाकूर भवन

२७ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी लोकनेते रामशेठ ठाकूर भवन या इमारतीचे उद्घाटन मा.शरदरावजी पवार यांचे हस्ते होत आहे. छत्रपती शिवाजी कॉलेजचे मराठी विषयाचे माजी विद्यार्थी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सत्कार्याचा परिचय करून देणारा हा लेख

छत्रपती शिवाजी कॉलेज हे रयत शिक्षण संस्थेचे पहिले कॉलेज.जून १९४७ पासून हे कॉलेज सुरु झाले.निवासी आणि कमवा आणि शिका योजनेत काम करून शिकण्याचा संस्कार करणारे हे स्वावलंबी शिक्षण देणारे कॉलेज अनेक गरीब होतकरू विद्यार्थ्यांचा आधार झाले.महाराष्ट्र तसेच कर्नाटक मधून अनेक विद्यार्थी इथे शिकून गेले.आज काश्मीरमधून काही विद्यार्थी इथे शिकायला येत आहेत.गरिबीतून शिक्षण घेतलेले जिद्दी विद्यार्थी या मातीत घडले.फलटण निवास आणि त्या पुढील खोल्यात त्यांची जडणघडण झाली. सामाजिक सेवेचा संस्कार,आणि कर्मवीरांच्या जीवनाचा आदर्श घेऊन अनेकांच्या जीवनात परिवर्तन करण्याचेकामयाकॉलेजमध्ये झाले. राजकारणी,कलावंत,पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,खेळाडू,विचारवंत,वकील,कुलगुरू, नेते शिक्षणतज्ञ,प्रशासकीय अधिकारी अशा अनेकविध क्षेत्रात इथली मुले चमकली. मराठी,हिंदी,इंग्रजी,संस्कृत,अर्धमागधीया भाषा आणि भूगोल,राज्यशास्त्र,अर्थशास्त्र,समाज शास्त्र,इतिहास ,मानसशास्त्र ,तर्कशास्त्र ,एन.सी.सी .जिमखाना विभाग यातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यार्थी गेले. प्रशासन अधिकारी मोठ्या प्रमाणात झाले. गावाकडून पत्र्याची पेटी आणि एखाद दुसरा सदरा,इजार घेऊन आलेले ,आणि कष्ट करून शिकणारे यात जास्त होते. निर्व्यसनी ,रयतेची सेवा करणारे,आपला केवळ स्वार्थ न साधता लोककल्याण करण्याची भावना जपणारे अनेक मुली आणि मुले या कॉलेजमधून बाहेर गेली. ती अजूनही हयात आहेत ते न विसरता कॉलेजला भेट देतात.याच जाणीवेचा मोठ्या मनाचा एक विद्यार्थी या कोलेजला मिळाला. रयत शिक्षण संस्थेचा कसलाही लाभ न घेता संस्थेला मनापासून देण्याची भावना असणारा हा विद्यार्थी म्हणजे रामशेठ चांगू ठाकूर साहेब.

आज हा लेख लिहिण्याचे प्रयोजन म्हणजेछत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणात बांधण्यात आलेली भव्य अशी पाच मजली इमारत ज्या बिल्डींगचे नाव रयत शिक्षण




संस्थेनेसन्मानाने 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' असे ठेवलेले आहे. ही इमारत ३६ हजार स्केअर फुटाची आहे.तळमजला धरून पाच मजली असणारी ही इमारत आणि छत्रपती शिवाजी कॉलेजच्या कार्यालयाचे नुतनीकरण करून भव्य सुंदर इमारत,आणि सुंदर कार्यालय तयार करण्यात आले आहे. आपल्या कॉलेजला स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी इमारत नाही, आपल्या कॉलेजला पदव्युत्तर शिक्षण व संशोधन केंद्रासाठी इमारत नाही, हे कळल्यावर स्वतःच्या इच्छेने ९ कोटी पर्यंतचा खर्च करून,स्वतः वारंवार भेटी देऊन ही इमारत लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांनी बांधून दिली आहे. आई वडिलांची काळजी घेणारा मुलगा जसा आस्थेने,ममतेने आई वडिलांनाना जपत असतो तसेच रामशेठ यांची माया छत्रपती शिवाजी कॉलेज आणि रयत शिक्षण संस्थेवर आहे. २७ डिसेंबर २०२१रोजी सकाळी ११ वाजता माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार शरदरावजी पवारसाहेब यांच्या हस्ते' इतर मान्यवरांच्या उपस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर भवन'या इमारतीचे उदघाटन करण्यात येत आहे.

प्रा. डॉ.सुभाष वाघमारे
छ. शिवाजी कॉलेज, सातारा
मो. नंबर ९८९०७२६४४०

**पूर्वार्ध**

नव्या युगात विद्यार्थी म्हणून कॉलेजशी कृतज्ञ कसे रहावे याचेस्मारकच जणू ही इमारत आहे. कष्ट करून स्वाभिमानाने रहावे, आपल्या अगोदरच्या काम केलेल्या कार्यकर्त्यांचा आदर कसा करावा,साधेपणाने राहून समाजातील सर्व घटकांशी मैत्री भावना कशी जपावी, सुख दुःखात सहभागी कसे व्हावे,चांगल्या गोष्टीची कदर कशी करावी हे सारे रामशेठ ठाकूर साहेब याचेकडून घेण्यासारखे आहे. द्वेषाचे राजकारण खेळत बसण्यापेक्षा सहकार समन्वय करून चांगली कार्ये करून घ्यावीत ही रयत मध्ये शिक्षण घेतलेल्या त्यांची सदोदित भावना आढळते. लोकनेते रामशेठ ठाकूर भवन ही इमारत अनेक पुढच्या पिढ्यांना दानशूरतेचा वारसा देईल. विशेषतः छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षण घेतलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याने एवढी मोठी इमारत बांधून दिलेली नाही. २८ रूम,लिफ्ट,फायर सिस्टीम,इत्यादी आधुनिक बाबीकडे काम करताना लक्ष देण्यात आले आहे इमारतीपुढे लॉनलावण्यात आली आहे. साई नर्सरी यांचेकडून फॉक्स टेल पाम ,गोल्डन सायप्रस,आय्क्झोरा ,टिकोमा ऑरेंज,कावडी ,जाकोबिना ,ड्रेसिना ,अरंथेमुम,फायकस ,बांबू ,टर्मिनालीस ,पेन्सिल पाईन,लांटेना,क्रोटोन्स इत्यादी झाडे लोकनेते रामशेठ ठाकूर भवन व कॉलेज प्रांगणात लावण्यात आली आहेत. त्यामुळे परवा सातारा जिल्हा युवा महोत्सवासाठी आलेल्या विविध कॉलेजच्या विद्यार्थ्यांना खूप आनंद मिळाला आहे. देखणी सुबक वास्तू आणि सुंदर निसर्ग यांचा संगमच इथे झाल्याने शिवाजी कॉलेजमध्ये आमुलाग्र बदल झाला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या देवापूर येथील वसतिगृहात व छत्रपती शिवाजी कॉलेजच्या कमवा आणि शिका योजनेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी फिरोज मेटकरी यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर भवन मध्ये व्हर्टिकल गार्डन तयार करून दिले आहे.महाविद्यालयाचे सौंदर्य वाढविण्यासाठी विविध फुलझाडे,लॉन ,इनडोआर प्लांट,व्हर्टिकल गार्डन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आले आहे. शिसम ,सोनचाफा ,कुडीका चाफा .गोल्डन सायप्रस,पेट्रा वनस्पतींची ची लागण केली



आहे..लॉन हे उद्यानाचे नाक आहे. लॉनमध्ये फुलझाडे तसेच रॉकरी करण्यात आली आहे. लॉनमध्ये शॉवर बसवण्यात आले आहेत.प्रत्येक स्मारकासमोर लॉन तयार केली असून टूरांटा,जट्रोफा,पेंडान्स व गोल्डन टूरांटा लावण्यात आला आहे.लोकनेते रामशेठ ठाकूर भवन च्या तळमजल्यात जिथे उद्घाटन समारंभाच्या नावाचा संगमरवरी फलक असेल त्याच्या सभोवती व्हर्टिकल गार्डन तयार करून विविध शोभेच्या वेली लावण्यात आल्या आहेत.ग्रीन मनी प्लांट ,यलो मनी प्लांट ,सिंगोनियामचे कोकोपीट लावण्यात आले आहे. या इमारतीच्या समोर सभोवार रम्य असा सुंदर निसर्ग उभा राहून वातावरण प्रसन्न झाले आहे.

..

न्हावे खाडी हे त्यांचे मूळ गाव.ते पुढे गव्हाणला स्थायिक झाले..रामशेठ ठाकूर यांनी आपल्या चांगुलपणाने महाभारतातल्या कर्णाला लाजवेल असे काम करून रयतेची मायामिळवली आहे.आपल्या समंजस स्वभावाने अनेक लोकांच्या हृदयात त्यांनी स्थान मिळवले आहे. गव्हाण येथे माध्यमिक शिक्षण घेताना त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती.उदरनिर्वाहासाठी खाडीतील गहू गोळा करायचे,रेल्वेच्या कामावर रोजाने जायचे,जंगलातून लाकडे आणायची,वह्या पुस्तके बाईन्दिग करून त्यांनी शिक्षण घेतले .गरिबीच्या जाणीवेतून ,आणि आईवडिलांच्या प्रेरणेने ते शिक्षणाकडे वळले.रामशेठ ठाकूर हे मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यानंतर परिसरात कोठेही कॉलेज नसल्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी सातारला पाठवण्यात आले. साधारण १९६८ ला ते पास झाल्यानंतर पुढे चार वर्षे ते सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये पी.डी. साठी एक वर्षे आणि बी.ए.पदवी साठी तीन वर्षे असे मिळून चार वर्षे ते छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिकत होते. छत्रपती शिवाजी कॉलेजच्या ६८-६९ या शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थी रजिस्टर मध्ये ३१३ क्रमांकला त्यांच्या प्रवेशाची आणि कॉलेज सोडल्याची नोंद आढळते.

(क्रमशः)